र केली
होईल.
मात्र
तसेच
ागांजाणे
र्यालयांना

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - १४/२/२०१२

**निवडणूक तात्काळ**

### आदेश

राज्य निवडणूक आयोगाने वितरित केलेल्या आचारसंहितेबाबतच्या पुस्तिकेमध्ये असलेल्या प्रश्नावलीतील प्रश्न क्र.५३ वर जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे प्रचारावर बंदी राहील, आणि एस.एम.एस. चा देखील समावेश राहील असे नमूद आहे.

तथापि, सदरहू सूचनेमध्ये जाहीर प्रचार बंदीनंतर उमेदवाराने घरोघरी जाऊन प्रचार करणे या संदर्भात कोणतीही स्पष्टता नाही.

जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर उमेदवार हे मतदान केंद्राचे १०० मीटर बाहेर मतदारांना भेटून तसेच घरोघरी जाऊन प्रचार करु शकतील. परंतु माईकचा वापर करता येणार नाही आणि उमेदवारांना समुहानेही फिरता येणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.

D:\D S\election 2012 gen refr .doc/mahale